# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक २५२/२०२४** **दिनांक-०५/०७/२०२४**

## "दिनांक २६ जुन-जागतिक अंमली पदार्थ दिनाचे औचित्य साधुन मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातर्फे आयोजित "प्रबोध" या पहिल्या आंतरमहाविदयालयीन स्पर्धांची अंतिम फेरी घेतलेबाबत

दिनांक २६ जुन या जागतिक अंमली पदार्थ दिनानिमीत्त मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील शाळा, महाविदयालयांमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले होते. पोलीस आयुक्त श्री.मधुकर पांडेय यांच्या अभिनव कल्पनेतून "प्रबोध" या संकल्पनेचा उदय झाला. २६ जून या अंतरराष्टीय अंमली पदार्थ विरोधी दिवसाला अनुसरून महाविदयालयातील विदयार्थ्यांचा सक्रिय सहभाग राहिल अशी आंतर महाविदयालयीन स्पर्धा आयोजित करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला आणि "प्रबोध" या आंतर महाविदयालयीन स्पर्धेची सुरुवात झाली.

निवडलेल्या एकुण ११ महाविदयालयांच्या अंतर्गत रांगोळी स्पर्धा, पोस्टर मेकींग स्पर्धा, रिल्स बनविण्याची स्पर्धा, एकपात्री नाटक व सांघिक नृत्य अशा एकुण पाच प्रकारच्या स्पर्धा विदयार्थ्यांसाठी तसेच सर्वोत्कृष्ट उत्सव, सर्वात नावीन्यपुर्ण कल्पना इत्यादी विषयांवरील स्पर्धांचे आयोजन त्या त्या महाविदयालयांमध्ये करण्यात आलेले होते. सदर स्पर्धांमधुन प्रथम आलेल्या सर्व विदयार्थ्यांची आंतर महाविदयालयीन स्पर्धा-"प्रबोध" ची अंतिम फेरी आज दिनांक ०५.०७.२०२४ रोजी लता मंगेशकर नाटयगृह, मिरारोड (पुर्व) येथे पार पडलेली आहे.

सदर कार्यक्रमाला १) एल.आर.तिवारी ज्युनिअर कॉलेज ॲन्ड डिग्री कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स ॲन्ड सायन्स, मिरारोड (पुर्व) २) एल.आर.तिवारी इंजिनिअरींग कॉलेज, मिरारोड (पुर्व) ३) एन.एल.दालमिया कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स ॲन्ड सायन्स, मिरारोड (पुर्व) ४) रॉयल कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स ॲन्ड कॉमर्स, मिरारोड (पुर्व) ५) शंकर नारायण कॉलेज ऑफ आर्टस, ॲन्ड कॉमर्स, मिरारोड (पुर्व) ६) अभिनव कॉलेज ऑफ आर्टस, ॲन्ड कॉमर्स, ॲन्ड सायन्स, मिरारोड (पुर्व) ७) रिना मेहता कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स, सायन्स ॲन्ड मॅनेजमेंट स्टडीज, भाईंदर (पश्चिम) ८) सेंट गोन्सालो गार्सिया कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड कॉमर्स, वसई ९) अण्णासाहेब वर्तक कॉलेज ऑफ आर्टस, केदारनाथ मल्होत्रा कॉलेज ऑफ कॉमर्स, ई.एस.ॲन्ड्रेस कॉलेज ऑफ सायन्स वसई १०) ए.ई.कळसेकर कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड कॉमर्स, नालासोपारा (पश्चिम) ११) विवा कॉलेज ऑफ आर्टस् कॉमर्स ॲन्ड सायन्स, विरार (पश्चिम) या महाविदयालयांचे मुख्याध्यापक, शिक्षक तसेच एकुण ८५० ते ९०० विदयार्थ्यांनी सहभाग घेतलेला आहे.

सदर कार्यक्रमाचे उदघाटन मा.पोलीस आयुक्त श्री.मधुकर पांडेय (भापोसे), मा.अपर पोलीस आयुक्त श्री.श्रीकांत पाठक, मा.पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.अविनाश अंबुरे, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री.मदन बल्लाळ तसेच मिरा-भाईंदर महानगरपालिका आयुक्त श्री.संजय काटकर यांचे हस्ते झालेले असुन कार्यक्रमाची सुरुवात दिपप्रज्वलनाने झालेली आहे. नमुद स्पर्धेमध्ये परीक्षक म्हणुन मा.संजीव त्यागी (कलाकार), फिरोज खान (नृत्यनिर्देशक), किशन बाल (कलाकार), श्रीमती स्नेहलता माघाडे (कलाकार), गौतम सुतार (रांगोळी करीता गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड विजेता) यांनी काम पाहिले. पार पडलेल्या स्पर्धेमध्ये खालीलप्रमाणे महाविदयालयांना पुरस्कार दिलेले आहेत.

| Sr. No | Competition Name | College Name |
|---|---|---|
| 1. | Overall Best Celebration | SN College |
| 2. | Most Innovative Idea | Vartak College |
| 3. | Best Community Engagement | Kalsekar College |
| 4. | Best Educational Campaign | LR Tiwari Degree College |
| 5. | Best use of Social Media | Reena Mehta College |

तसेच रांगोळी या स्पर्धेमध्ये एल.आर.तिवारी या महाविदयालयास प्रथम क्रमांक देण्यात आलेला आहे. तसेच पोस्टर मेकींग स्पर्धेमध्ये विवा महाविदयालयास प्रथम क्रमांक देण्यात आलेला आहे. तसेच रिल्स बनविण्याची स्पर्धेमध्ये वर्तक महाविदयालयास प्रथम क्रमांक देण्यात आलेला आहे. तसेच एकपात्री नाटक स्पर्धेमध्ये दालमिया महाविदयालयास प्रथम क्रमांक देण्यात आलेला आहे. तसेच सांघिक नृत्य या स्पर्धेमध्ये रिना मेहता महाविदयालयास प्रथम क्रमांक देण्यात आलेला आहे.

जागतिक अंमली पदार्थ दिनानिमीत्त मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयामध्ये अशा प्रकारची स्पर्धा प्रथमच आयोजीत करण्यात आली असुन सदर स्पर्धेला महाविदयालयीन विदयार्थ्यांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळालेला आहे.


Drugs
Destroy
Lives
प्रबोध


प्रबोध


Mira-Bhayandar, Vasai-Virar Police Commissionerate
प्रबोध
Drugs
Destroy
Lives


प्रबोध


Mira-Bhayandar, Vasai-Virar Police Commissionerate
प्रबोध
Empowering Youth. Embracing Life: Say NO to DRUGS!
GRAND FINALE
Drugs
Destroy
Lives
Do
What
Makes you
Happy
Life
is better
With
Friends

---------oooo-----------